**नि.फौ.ख.क्र. १२१/२०१६**
**सरकार वि. दादासाहेब वगैरे व इतर**
**निशाणी क्र. ८१**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांची साक्ष**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– सत्यवान रंगनाथ देवकुळे
**वय** :– ४८ वर्षे, **धंदा** :– व्यवसाय
**राहणार** :– गोमेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए. पी. केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत**

१. मी गोमेवाडी येथे मागील १४ ते १५ वर्षांपासून राहत आहे. मी फिर्यादी व आरोपींना ओळखतो, ते माझ्या गावातील आहेत.

२. घटना कधी घडली होती, काय घडली होती हे मला आठवत नाही. घटनेबाबत माझ्याकडे पोलीसांनी चौकशी केली नव्हती. माझा जबाब नोंदविला नव्हता.

**सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे विद्यमान सहा. सरकारी वकील यांना तोंडी विनंती वरुन साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली**

३. हे मला आठवत नाही की, दिनांक १६/०९/२०१६ रोजी मी, गणपती मंदीराजवळ थांबलेलो असताना आरोपींनी फिर्यादी यांना मारहाण केली, शिवीगाळ केली, जिवे मारण्याची धमकी दिली. असे घडले नाही की, मी, रमाकांत, सतिश आणि नानासो अशांनी भांडणाची सोडवासोडव केली. आता मला माझ्या बयाणातील **पोर्शन मार्क–अ** वाचून दाखविला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. सदर बाब माझ्या जबाबात नमूद असण्याचे कारण मला सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना शिक्षा होवू नये असे मला वाटत असल्यामुळे त्यांना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे – श्री. पी. डी. जेडगे विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

५. नाकारला.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.03.07 16:43:21 +0530

दि. ०७/०३/२०२६
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी